सी.एन.आर नं.१९०००४२४२०२४

# नियमित दिवाणी दावा १४०/२०२४ नि. २३ वरील आदेश

प्रतिवादी तर्फे प्रस्तूतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती करण्याकरीता दिलेला आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे,

सदरील प्रतिवादी यांनी मुळ वादी यांच्याविरूध्द प्रतिदावा दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदर प्रतिदाव्यातील कॉलम नं. २ मध्ये दुस-या ओळीमध्ये टाईप मिस्टेकमुळे वयोवृध्द ऐवजी विरूध्द हा शब्द टाईप झाला आहे त्यामुळे प्रतिवादीने विरूध्द या शब्दाऐवजी वयोवृध्द हा शब्द लिहिण्याची व झालेल्या शब्दाच्या पुढे आहेत हा शब्द लिहिण्याची व तशी दुरूस्ती करणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदरील अर्जावर वादी यांनी त्यांचे म्हणने देवून सदर अर्जास हरकत घेतली आहे व सदरचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी वादीने केली आहे.

४. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा अर्ज, प्रतीवादीचे म्हणणे व अभिलेखाची पाहणी केली असता असे दिसून येते की, वादीतर्फे सदरचा दावा हा निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनानुसार सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरूपात बदल होत नाही.

५. दुरुस्ती अर्जाच्या अनुशंगाने दिवाणी प्रकिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता त्यामध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे की, “ The Court may at any stage of the proceedings allow either party to alter of amend his plaint in such manner and on such terms as may be just, and all such amendment shall be made as may be necessary for the purpose of determining the real questions in controversy between the parties” दाव्यात सदरील अनुषंगाने दुरुस्ती करता येईल.

६.	प्रस्तुत प्रतीवादीने मागितलेली दुरुस्ती विचारात घेता  सदरील दुरुस्ती ही आवश्यक व तांत्रिक स्वरुपाची असल्याचे दिसून येते.  तसेच त्या अनुशंगाने अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी कडून  प्रतिदाव्यामध्ये टायपोग्राफीकल मिस्टेक झालेली आहे. त्या अनुशंगाने दाव्याच्या योग्य व न्यायोचित निर्णयाकरीता तसेच दाव्यात गुंतागूंत होवू  नये याकरीता सदरील दुरुस्ती आवश्यक आहे.  सदरील दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही.  तसेच वादींच्या कथनांवर देखील कोणताही परिणाम होणार नाही.

७.		एकंदरीत उपरोक्त केलेल्या विवंचनेचा साकल्याने विचार केला असता प्रतीवादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र  आहे.  प्रतिवादीने मागणी केल्याप्रमाणे  दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये आणी दाव्याच्या कारणांमध्ये कोणताही बदल होणार नाही   वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे मुळ कारण पुर्णपणे निकाली काढण्याकरीता, योग्य न्यायदानाच्या दृष्टीकोनातून त्याचप्रमाणे भविष्यातील इतर दावे, प्रतिदावे टाळण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती अत्यंत आवश्यक असल्याचे दिसून येते.  त्यामुळे खालीप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **आदेश**

१.	अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.	प्रतीवादीने सदरची दुरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्त  प्रत अभिलेखावर दाखल करुन वादींना देखील ती पुरवावी.

VRUSHALI BABURAO DOMBE
Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2024.04.03 17:00:43 +0530

व्ही.बी.डोंबे
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
शेवगाव

दिनांक -०३/०४/२०२४